ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

## वाङ्मयीन नियतकालिके विशेषांक

# तिफण

वर्ष : १५ वे । अंक : पहिला
जानेवारी ते मार्च : २०२४



# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शोधनिबंधाचे शीर्षक | शोधनिबंध लेखकाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| १ | नियतकालिकांची संकल्पना, प्रकार व प्रेरणा | डॉ. बी.पी. गार्डी | ९ |
| २ | मराठी नियतकालिकांची वाटचाल | डॉ. बाळासाहेब सुतार | १२ |
| ३ | मराठी नियतकालिकांची वाटचाल | डॉ. राजेंद्र बावळे | १९ |
| ४ | मराठी वाङ्मयीन नियतकालिके संकल्पना, स्वरूप, वाटचाल | डॉ. कुंडलिक पारधी | २२ |
| ५ | मराठीतील वाङ्मयीन व वैचारिक नियतकालिके : स्वरूप व वाटचाल | डॉ. भाऊसाहेब नन्नवरे | ३० |
| ६ | मराठीतील वाङ्मयीन नियतकालीकांची परंपरा व वाटचाल | कल्पेश बिरादार | ३५ |
| ७ | मराठीतील वाङ्मयीन नियतकालीकांची परंपरा व वाटचाल | मोहिनी सावंत | ४० |
| ८ | स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी नियतकालिकांचे वाङ्मयीन कार्य | प्रा. पुरुषोत्तम सूर्य | ४६ |
| ९ | स्वातंत्र्योत्तर मराठी नियतकालिकांची वाटचाल | तुषार पाटील | ५३ |
| १० | समकालीन मराठी नियतकालीकांची वाटचाल | संगीता भगत | ५८ |
| ११ | मराठी साहित्य संस्थांच्या नियतकालिकांचा वाङ्मयीन आढावा | प्रा. प्रवीण गायकर | ६६ |
| १२ | साठोत्तरी मराठी नियतकालिकांचा परामर्श (१९६०-१९७५) | डॉ. सोनू लांडे | ७२ |
| १३ | भाषांतराला वाहिलेले मराठी नियतकालिक 'केल्याने भाषांतर' | डॉ. सहदेव चव्हाण | ७७ |
| १४ | कोकणातील मराठी नियतकालिके (मर्यादा-रत्नागिरी जिल्हा) | प्रा. राजरत्न दवणे | ८२ |
| १५ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियतकालिकांतील वैचारिकता | डॉ. सुनील परदेशी | ९४ |
| १६ | १९३३-१९५६ या काळातील फुले-आंबेडकरी प्रेरणेच्या प्रारंभिक साहित्याची जडणघडण आणि 'जनता' या साप्ताहिकाची कामगिरी | डॉ. अश्विनी तोरणे | ९८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | वाङ्मयीन अभिरुची जडणघडणीत नियतकालिकांचे योगदान | डॉ. विद्या नावडकर | १०५ |
| १८ | 'ज्ञानोदय' नियतकालिकातील शेतीविषयक विचारांचा परामर्श (१८४२ ते १८५०) | मधू गुमाडे<br>डॉ. संजय गवळी | १११ |
| १९ | सत्सार: विद्रोही अनियतकालिक | प्रा. प्रमोद शेटे | ११८ |
| २० | 'ज्ञानमोचक' नियतकालिकाचे स्वरूप व भूमिका | दत्तात्रय बाळासाहेब सोनवणे | १२२ |
| २१ | स्त्रीमुक्तीची तळी उचलणारे मासिक 'मिळून साऱ्याजणी' | डॉ. शिवराज कोचे | १२६ |
| २२ | वाचनवृद्धीसाठी 'मिळून साऱ्याजणी' चे योगदान | प्रा. सुप्रिया नवले | १३२ |
| २३ | नियतकालिकांतील स्त्रियांचे कथालेखन व अनुभवविश्व (१९८० नंतर) | प्रा. तुकाराम भवर | १३५ |
| २४ | १९७५ पासूनची मराठीतील स्त्रियांच्यासाठी वाहिलेली नियतकालिके आणि स्त्री संघटनांची मुखपत्रे | प्रा. विजया ठाकूर | १४० |
| २५ | मराठीतील स्त्रीवादी नियतकालिकांची वाटचाल | डॉ. उज्ज्वला सामंत | १४५ |
| २६ | स्त्रीयांसाठी वाहिलेल्या नियतकालिकांची वाटचाल | अभिता निकम<br>डॉ. पद्माकर तामगाडगे | १५४ |
| २७ | मराठीतील स्त्रीवादी नियतकालिकांचा परामर्श | डॉ. संदीप चपटे | १५९ |
| २८ | आदिवासी नियतकालिकांचे वाङ्मयीन आणि सामाजिक कार्य | डॉ. संजय मेस्त्री<br>डॉ. तुकाराम रोंगटे | १६४ |
| २९ | 'हाकारा' नियतकालिकातील आलेल्या आदिवासी कवितांची आशयसूत्रे | डॉ. विकास बहुले | १७० |
| ३० | साप्ताहिक 'साधना'चे महाराष्ट्रातील सार्वजनिक आणि सामाजिक योगदान | डॉ. संतोष पवार | १८० |
| ३१ | मराठी नियतकालिकांची वाटचाल आणि 'तिफण'ची वाङ्मयीन कामगिरी | डॉ. ताहेर एच.पठाण | १८४ |
| ३२ | 'फडकी' नियतकालिकाचे वाङ्मयीन स्वरूप | प्रा. चिंतामण धिंदळे | १९१ |
| ३३ | 'तिफण'चा समकालीन कथा व व्यावहारिक मराठी विशेषांक | डॉ. भास्कर शेळके | १९६ |
| ३४ | कैलास दौंड साहित्य विशेषांक | डॉ. रंजना कदम | २०४ |
| ३५ | 'तिफण'चा लोककला विशेषांक | सुनील घनकुटे | २१७ |
| ३६ | वाङ्मयीन नियतकालिकांसमोरील आव्हाने | डॉ. शिवाजी हुसे | २२९ |
| ३७ | 'तिफण'चा मराठी बोलीभाषा विशेषांक | डॉ. प्रेमला मुखेडकर | २३२ |

# पंधरा वर्षे 'तिफण'ची...


तिफण हे कृषकांचे पेरणी करण्याचे एक महत्वाचे अवजार आहे. शेतकरी उन्हाळ्यात नांगरट करून मशागत करतो व रान पेरणीसाठी तयार करतो. पाऊस पडला की तिफण या अवजाराने पेरणी करतो. या अर्थाने तिफण हे सृजनांचे प्रतिक आहे. हेच प्रतिक घेऊन कन्नडसारख्या ग्रामीण व दुर्गम भागातून वाङ्मयीन चळवळींना बळ देऊन नवलेखकांना हक्काचे व्यासपीठ मिळावे या महत्वपूर्ण उद्देशाने २००९ मध्ये बलिप्रतिप्रदेला बळीराजास वंदन करून 'तिफण' या मराठीतील एका त्रैमासिकाची सुरुवात झाली. साहित्य सृजनांची पेरणी म्हणजे तिफण.



**श्री. शिवाजी हुसे**
-संपादक, 'तिफण'

कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयात मा. प्राचार्य डॉ. विजय भोसले व निवडक सहकारी मित्रांच्या हस्ते 'तिफण'च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले होते. प्रसिद्ध चित्रकार सरदार जाधव यांच्या कुंचल्यांतून 'तिफण'चा लोगो व पहिल्या अंकाचे मुखपृष्ठ साकार झाले आहे. युजीसी केअर लिस्टमध्ये तिफणचा समावेश झाला असून राज्यभर व राज्याबाहेर 'तिफण'चा लेखक-वाचकवर्ग आहे. 'तिफण'च्या या वाटचालीमध्ये अनेकांचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष मार्गदर्शन, सहकार्य व प्रेरणा मिळालेली आहे.

त्रैमासिक 'तिफण'चे हे पंधरावे वर्ष आहे. एखादे नियतकालिक सुरु करणे आणि ते सतत १५ वर्षे अखंडपणे चालविणे ही अत्यंत कठीण बाब आहे. कोणतीही परिस्थिती अनुकूल नसताना कन्नडसारख्या ग्रामीण भागातून आम्ही 'तिफण'ची सुरुवात केली. अनेक संकटांवर मात करीत 'तिफण'ची यशस्वी वाटचाल सुरु आहे. हा सर्व प्रवास साधा, सोपा, सहज मुळीच नव्हता. आमचे अनेक लेखक, वाचक, चित्रकार, पत्रकार, संपादक अशा अनेकांचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष मार्गदर्शन व सहकार्य 'तिफण'ला मिळालेले आहे. 'तिफण'ने अनेक उपक्रम राबवून नव्या लेखकांचा शोध घेऊन त्यांना वाङ्मयीन प्रवाहात सहभागी करुन घेतले आहे. त्यांना मार्गदर्शन करुन उत्तमोत्तम लिहिण्यासाठी प्रेरीत केले आहे. त्यातील बहुतेकांची पुस्तकेही प्रसिद्ध झालेली आहेत, तर काही प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. 'तिफण', 'तिफण वाचक चळवळ', 'तिफण प्रकाशन', 'तिफण डिजिटल', 'तिफण यूट्युब चॅनल' अशा विविध माध्यमांत 'तिफण' कार्यरत आहे. काव्यवाचन, निबंधलेखन स्पर्धा, पुस्तक प्रकाशने, लेखक-वाचक मेळावा, पुस्तक प्रदर्शन, 'लेखक-वाचक जोडो' अभियान, कवी कट्टा, प्रातिनिधिक कवितासंग्रह, कथासंग्रहांचे संपादन व प्रकाशन तसेच 'तिफण कविता महोत्सव', 'तिफण पुरस्कार', कन्नड तालुका साहित्य सन्मान, कवितालेखन कार्यशाळा, कविसंमेलने, राष्ट्रीय चर्चासत्रे अशा कितीतरी उपक्रमांतून 'तिफण'ने वाङ्मयीन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. 'तिफण' हे केवळ एक नियतकालिक न राहता 'तिफण' एक वाङ्मयीन चळवळ झाली आहे. अनेक लिहित्या हातांना 'तिफण'ने कायम पाठबळ दिले आहे. वीसपेक्ष अधिक महत्त्वाचे विशेषांक प्रसिद्ध करुन आपले वेगळेपण 'तिफण'ने जपले आहे.



*कन्नड येथील याच घरातून 'तिफण'ची सुरुवात झाली.*

बघता बघता 'तिफण' पंधराव्या वर्षात पदार्पण करीत आहे, याचा आम्हांस निश्चितच आनंद आहे. या सर्व वाटचालीत प्रत्यक्षाप्रत्यक्ष अनेकांचे पाठबळ मिळाले आहे. 'तिफण'कडे एक हक्काचे व्यासपीठ म्हणून आज वाङ्मयीन क्षेत्रात बघितले जात आहे. सतत नाविन्यतेचा ध्यास, परिवर्तनाची आस आणि भविष्याची जाण ठेवून हा ध्येयवादी प्रवास सुरू आहे. 'साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक' हे ब्रीद घेऊन 'तिफण'ची ओसाड माळरानावर अक्षरपेरणी सुरू आहे.

रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर कॉलेज फुंडे ता. उरण जि. रायगड मराठी विभागाच्या वतीने मराठीतील वाङ्मयीन व वैचारिक नियतकालिके : सद्य : स्थिती व आव्हाने या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले होते. वाङ्मयीन नियतकालिके चालविणे अत्यंत अवघड आहे. या चर्चासत्रात या विषयावर व्यापक विचारमंथन होऊन अनेक अभ्यासकांनी आपले शोधनिबंध लिहिले. तिफणच्या दृष्टिने हा विषय महत्वाचा आहे. त्यामुळेच हा विशेषांक प्रसिद्ध केला आहे. या अंकासाठी प्राचार्य डॉ. प्रल्हाद पवार, मराठी विभाग प्रमुख, प्रा. गजानन चव्हाण, प्रा. चिंतामण दिंधळे त्याबरोबरच प्रत्यक्षाप्रत्यक्ष अनेकांचे सहकार्य मिळाले आहे. सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद.

पंधराव्या वर्षाचा शुभारंभ अंक हा वाङ्मयीन नियतकालिकांचा आढावा घेणारा असून वाङ्मयीन नियतकालिकांचे योगदान अधोरेखीत करण्याचा प्रयत्न या विशेषांकाच्या पाठीमागे आहे. त्यामुळेच 'तिफण'चा वाङ्मयीन नियतकालिके विशेषांक प्रसिद्ध करीत आहोत. वाङ्मयीन नियतकालिकांना १९१ वर्षांची प्रदीर्घ परंपरा लाभली आहे. मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि समाजजीवनाला समृद्ध करण्याचे




**वाङ्मयीन नियतकालिके विशेषांक**

# वाङ्मयीन नियतकालिकांसमोरील आव्हाने

डॉ. शिवाजी हुसे

मराठी साहित्यात वाङ्मयीन नियतकालिकांची मोठी समृद्ध परंपरा आहे. नियतकालिक म्हणजे जे नियमित प्रकाशित होते ते. जे रोज प्रसिद्ध होते त्यास दैनिक, आठवड्यातून एकदा प्रसिद्ध होणारे साप्ताहिक, पंधरवाड्यातून निघणारे ते पाक्षिक, महिन्याला प्रसिद्ध होणारे मासिक, तीन महिन्यांनी निघणारे त्रैमासिक, वर्षातून एकदा प्रसिद्ध होणारे वार्षिक. अशी नियतकालिके मराठीतून सातत्याने प्रसिद्ध होतात. मराठीतील 'दर्पण' हे बाळशास्त्री जांभेकर यांनी काढलेले पहिले वृत्तपत्र समजले जाते (१८४०). त्यानंतर 'प्रभाकर' (१८४१) भाऊ महाजन, 'शतपत्रे'- लोकहितवादी, 'धुमकेतू'- भाऊ महाजन, 'ज्ञानोदय', ज्ञान प्रकाश, इंदुप्रकाश, 'वर्तमान दिपिका' अशी नियतकालिकांची परंपरा मराठीत सुरु झाली. विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंधमाला' केसरी व मराठी ही वृत्तपत्रे (१८७४-१८८१) सुरू केली. १८३२ पासून ते आजपर्यंत मराठीत हजारो नियतकालिके प्रसिद्ध झाली. काही नियमित सुरू आहेत, तर त्यातील अनेक नियतकालिके बंद पडली.

नियतकालिकांच्या या परंपरेत मनोरंजन, केरळ कोकिळ, पुरूषार्थ, विविधवृत्त, विविध-ज्ञानविस्तार, प्रसाद, किर्लोस्कर, युगवाणी, माणूस, सत्यकथा, अभिरुची, सोबत, साधना, अमृत, अंतर्नाद, रुची, शब्द, ललित, अनुभव, अक्षरवैदर्भी, परिवर्तनाचा वाटसरु, अर्थक्रांती, जडणघडण, भवताल, साप्ताहिक लोकप्रभा, साप्ताहिक सकाळ, विवेक, चित्रलेखा अशी

कितीतरी नियतकालिकांनी मराठी साहित्यातला योगदान दिले आहे.

या नियतकालिकांतून मराठी साहित्यात अतिशय दखलपात्र साहित्यकृतींचा जन्म झाल्याचे दिसून येते. या सर्वच नियतकालिकांची कामगिरी ही लक्षणीय राहिलेली आहे, हे मान्यच करावेच लागते. प्रसिद्ध कालानुसार नियतकालिकांचे वर्गीकरण करता येते. त्यामध्ये साप्तहिक, पाक्षिक, मासिक, त्रैमासिक, षन्मासिक, वार्षिक, तर विषय व आशयानुसार, मुलांची, स्त्रीयांची, वाङ्मयीन, मनोरंजनात्मक, वैचारिक, संशोधनपर, अशी वर्गवारी करता येते. सुरूवातीपासून तर आजतागायत मराठी नियतकालिकांमध्ये प्रचंड बदल झालेला दिसून येतो. छपाईचे तंत्र बदलले. विशेषत: ऐंशीच्या दशकात टाईपसेटींग करुन संगणकावर जुळवलेला सुबक व आकर्षक मजकूर छापला जाऊ लागला. त्यामुळे नियतकालिकांच्या स्वरुपामध्ये अंतर्बाह्य बदल झाला.

सुरूवातीपासून आजपर्यंत प्रसिद्ध होणारी नियतकालिके पाहिली तर असे जाणवते की, त्यापैकी ही नियतकालिके प्रदीर्घकाळ टिकून राहिली, तर काही अत्यंत अल्पजिवी ठरली. वाङ्मयीन क्षेत्रातील नियतकालिकांनी, त्यातही साहित्यसंस्थांची मुखपत्रे असलेल्या नियतकालिकांनी मराठी वाङ्मयीन व्यवहारात मोलाची कामगिरी केली. काही प्रकाशक संस्थांची नियतकालिकेही सातत्याने प्रसिद्ध होतात. या नियतकालिकांतून लेखन करणारे अनेक लेखक नावारुपास आले.

निखळ वाङ्मयीन नियतकालिकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. काहीच नियतकालिके सातत्याने प्रकाशित होता. त्यात अनुष्टूब, कवितारती, प्रतिष्ठान, अस्मितादर्शन ही आधीची, तर नव्यानेही अनेक नियतकालिके निघाली. गेल्या शंभर वर्षांत मराठीत प्रचंड वाङ्मयीन नियतकालिके प्रसिद्ध झालेली आहेत. शब्दवेध, दर्शन, खेळ ही नियतकालिके आजही टिकून आहेत. १९९० नंतरही अनेक वाङ्मयीन नियतकालिके आली. विशेषत: २००९ नंतर अक्षरवाङ्मय, अक्षरगाथ, तिफण, सर्वधारा ही नियतकालिके सातत्याने प्रकाशित होत असून उत्तमोत्तम अंक प्रसिद्ध करीत आहेत. ई-नियतकालिकांचा सुळसुळाट झाला असून काही हौसेखातर, तर त्यातील निवडक नियतकालिके दखलपात्र ठरत आहेत. त्यामध्ये प्रतिलिपी, अक्षरनामा वगैरे, इंग्रजीमध्ये फोर क्वॉर्टर्स मॅगझीन, लिटररी रिव्ह्यू, अश्वमेध, द लिटल मॅगझीन तर हिंदीमध्ये अतिशय दर्जेदार असलेली पक्षघर, पहल, तद्भव, वसुधा, कथादेश, जलसा, समयांतर अनेक वर्षांपासून सुरू आहेत. नव्वदच्या दशकात अनेक नवी नियतकालिके निघू लागली. शब्दवेध, अमिधा, अभिदानंतर, सौष्ठव, खेळ, नवाक्षरदर्शन, ऐवजी, ऊर्मी, तिफण, अक्षरगाथा, अक्षरवाङ्मय, आशयघन, सक्षम समीक्षा, तर एका वाङ्मय प्रकाराला वाहिलेली काही नियतकालिके दिसून येतात. कवितारती, ऊर्मी, समास आदि. साधना, प्रतिष्ठान, युगवाणी, मायमावशी, अस्मितादर्श, मराठी संशोधनपत्रिका, समाजप्रबोधन पत्रिका यांनी वेगळी ओळख निर्माण केली.

'ऐवजी', मुक्तशब्द, अक्षरगाथ, अक्षरवाङ्मय, तिफण, मुक्तसृजन, सर्वधारा यांनी नव्या लेखकांना अधिक संधी दिली आहे. 'ऐसी अक्षरे', 'रिंगण', एकरेघ यांनीही आपली ओळख निर्माण केली आहे. अक्षरनामा, मराठी माती, यांचेही लेखकांना विशेष आकर्षण आहे.

सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक जीवनात या नियतकालिकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. वाङ्मयीन संस्कृती संवर्धन व वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी ही नियतकालिके महत्वपूर्ण आहेत. मराठी वाचकांची अभिरुची समृद्ध करण्याचेही काम ही सर्व नियतकालिके करतात.

संशोधनासाठीही संशोधकांना दिशा देण्यासाठी,

विषयाचा शोध घेण्यासाठी, नवीन पुस्तके शोधण्यासाठी, साभार पुस्तकांची सूची म्हणून शोधनिबंध लेखनपद्धती समजून घेण्यासाठी, संदर्भसूची समजण्यासाठी अशा अनेक प्रकारचा उपयोग या नियतकालिकांचा आहे. नवलेखक, समिक्षक, संशोधक आणि वाचक त्याहीपेक्षा, सजग व सुसंस्कृत माणूस घडविण्यासाठी या वाङ्मयीन नियतकालिकांचा मोठा वाटा आहे.

ही सर्व नियतकालिके आज शेवटच्या घटका मोजताना दिसत आहेत. त्यासाठी वर्गणीदार झाले पाहिजे. विशेषांक संग्रही ठेवले पाहिजे. काही महत्वपूर्ण लेखांचे संकलन केले पाहिजे. लेखक, वाचक, संशोधक आणि मराठीच्या अध्यापकांना संदर्भसाधन म्हणून ही नियतकालिके महत्त्वाची आहेत. ग्रंथालये, शाळा, महाविद्यालये, विविध संस्था, संघटना, आस्थापने यांनीदेखील या नियतकालिकांचे वाचक-वर्गणीदार होणे आवश्यक आहे.

मराठी वाङ्मयीन नियतकालिकांपुढे आज प्रचंड आव्हाने आहेत. या आव्हानांचा सामना करीत ही सर्व नियतकालिके कशीबशी प्रसिद्ध होत आहेत. कागदाचे, प्रिंटींगचे वाढते दर, वाचकांनी फिरवलेली पाठ, जाहिरातींचा अभाव, डिजिटल नियतकालिकांचा वाढता सुळसुळाट, तसेच केवळ प्रमोशनसाठी या नियतकालिकांतील लेखनाचा वापर करुन घेतला जाता. नवे लेखक, संशोधक गांभीर्याने या सर्व गोष्टींकडे पाहत नाहीत. मराठी शिक्षक, लेखक, वाचक, कर्मचारी यांनी नियतकालिकांशी नाते जोडले पाहिजे. तरच त्यांना भवितव्य आहे. या नियतकालिकांना राजाश्रयाबरोबर लोकाश्रयही मिळाला पाहिजे. तरच ही नियतकालिके तग धरु शकतील. आजच्या बदलत्या काळात या सर्व आव्हानांचा सामना करण्यासाठी संपादकांनी फेसबुक पेज, युट्यूब चॅनल, वेबसाईट, ऑनलाईन हे मार्गही स्वीकारले पाहिजेत. सातत्याने लेखक-वाचक यांचा सुसंवाद घडविणारे उपक्रम हाती घेतले पाहिजे. शाळा, महाविद्यालये व ग्रंथालये यांना जोडून घेतले पाहिजे. त्यासाठी सर्वांनीच एकत्र येऊन आव्हानांचा स्वीकार करुन नवे पर्याय दिले पाहिजे. नव्या बदलांचा स्वीकार करुन वाचक-लेखकांना नवे काहीतरी दिले पाहिजे. त्याशिवाय आता पर्याय उरला नाही.

•••

**–डॉ. शिवाजी हुसे**
मराठी विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय,
कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर.